आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,

बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे

**मराठी विभाग वार्षिक अहवाल**

**२०१९ – २०२०**

**दि. /०३/२०२०**

**१. दृक – श्राव्य कार्यक्रम :**

मराठी विभागातील एस. वाय. बी. ए. विशेष स्तर क्र. १ साठी **'नटसम्राट'** ही नाटयकलाकृती अभ्यासाला असल्या कारणाने त्या नाटयकलाकृतीची व्ही. सी. डी. मराठी विभागातील एल. सी. डी. वर विद्यार्थ्यांना दि. १२/०८/२०१९ रोजी दाखविण्यात आली. यावेळी विभागाचे २० विद्यार्थी व ०२ शिक्षक उपस्थित होते.

**२. विद्यार्थी चर्चासत्र :**

महाविद्यालयातील मराठी विभाग व इंग्रजी विभाग या दोन्हींच्या संयुक्त विद्यमाने थोर भारतीय नाटककार आणि कन्नड लेखक डॉ. गिरीश रघुनाथ कार्नाड यांच्या समग्र साहित्यावर आणि त्यांच्या जीवन प्रवासावर दृष्टिक्षेप टाकण्यासाठी दि. २६/८/२०१९ विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे विद्यार्थी चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ. गिरीश रघुनाथ कार्नाड यांच्या समग्र वाङ्मयीन, सांस्कृतिक, भारतीय रंगभूमी विषयक, कला विषयक कार्यकर्तृत्त्वावर निबंध लेखन करून सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. गिरीश कार्नाड यांचे बालपण, शिक्षण, नोकरी, त्यांना मिळालेले विविध मानसन्मान व पुरस्कार, त्यांचे कन्नड भाषेतील नाटयवाङ्मय, आत्मचरित्र लेखन, त्यांनी केलेले अनुवाद, भारतीय रंगभूमी आणि नाटक, चित्रपट अभिनेते ते दिग्दर्शन, पटकथालेखन, विविध दूरदर्शन मालिकांचे लेखन, विविध चर्चासत्रे व परिषदांमधील त्यांचा यशस्वी सहभाग, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील त्यांचा सहभाग इ. विषयांवर विद्यार्थ्यांनी पी.पी. टी. द्वारे निबंधाचे सादरीकरण केले. या सादरीकरणात कु. स्नेहगंधा चव्हाण, आकांक्षा कडाळे, करूणा पोखरकर, सायली घुले, मोहिनी केंगले, रविना पारधी, अश्विनी डांगले, सविता भवारी, श्री. तुषार गभाले, आनंदा बांगर, धनेश जंगले, किशोर उघडे, नितेश काळे इ. निवडक विद्यार्थ्यांनी डॉ. गिरीश रघुनाथ कार्नाड यांच्या साहित्यावर निबंधाचे सादरीकरण करून विद्यार्थी चर्चासत्राची रंगत वाढविली.

याशिवाय मराठी विभागाने दुसरे विद्यार्थी चर्चासत्र थोर फुले आंबेडकरी लेखक कवी राजा ढाले यांच्या साहित्यावर आणि त्यांच्या जीवन प्रवासावर दृष्टिक्षेप टाकण्यासाठी विद्यार्थी चर्चासत्राचे आयोजन केले होते १८/९/१९ रोजी या चर्चासत्रात महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी कवी राजा ढाले यांच्या कार्यकर्तृत्वावर निबंध लेखन करून सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांचे बालपण, शिक्षण, आंबेडकरवादी चळवळ, नामांतर लढा, दलित पॅंथरची स्थापना, आंबेडकरवादी साहित्यकारण व राजकारण, लघुअनियतकालिकांची चळवळ, विशेषत: त्यांचे काव्यलेखन, साधना साप्ताहिकातील भारतीय स्वातंत्र्याला प्रश्न विचारणारा लेख 'काळा स्वातंत्र्यदिन', त्यांना मिळालेले विविध मानसन्मान व पुरस्कार, इ. विषयांवर विद्यार्थ्यांनी पी. पी. टी. द्वारे निबंधाचे सादरीकरण केले. या सादरीकरणात कु. स्नेहगंधा चव्हाण, श्री. समीर गारे, श्री. अमेय कांबळे, श्री. किशोर उघडे, श्री. गणेश पारधी, इ. निवडक विद्यार्थ्यांनी कवी राजा ढाले यांच्या काव्यलेखन व साहित्य चळवळीवर निबंधाचे सादरीकरण करून चर्चासत्राची रंगत वाढविली.

**३. .वर्तमानपत्राची कात्रणे**

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार दैनिकातील वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक कात्रणे संग्रहीत केली आहे. या कात्रणांचे वाचनही विभागातील विद्यार्थ्यांनी केले आहे. या वाचनामुळे विद्यार्थ्यांची वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक समज वाढण्यास मदत झाली आहे.

४. **YouTube द्वारे अध्यापन** :

दि. ०१/१०/२०१८ रोजी सकाळी १०.१० वा. मराठी व इंग्रजी विभागातील सर्व विद्यार्थी एकत्रित करून नाटकाशी निगडित असलेल्या दिल्ली येथील नॅशनल स्कूल ड्रामा या नाट्यविषयक संस्थेच्या कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. यावेळी दोन्ही विभागातील ३० विद्यार्थी उपस्थित होते.

५. **Skype द्वारे संवाद** :

दि. २२/०९/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. Fukuoka University Japan येथील **Saoko Funada** यांच्याशी द्वितीय वर्ष कला या वर्गातील निवडक विद्यार्थ्यांनी **Skype** द्वारे संवाद साधला. या कार्यक्रमासाठी प्रा. सोमनाथ जगताप यांनी विशेष प्रयत्न करून हा कार्यक्रम यशस्वी केला आहे. यावेळी २२ विद्यार्थी व २ शिक्षक उपस्थित होते.

**६. वाचन प्रेरणा दिन**

मराठी विभागाने १५/१०/२०१९ रोजी वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने सामूहिक वाचनाचे आयोजन केले होते. या सामूहिक वाचनात सद्यस्थितीतील नामवंत कादंबरीकार प्रा. रंगनाथ पठारे यांच्या गाजलेल्या **'सातपाटील कुलवृत्तांत'** या कादंबरीचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले. या शिवाय **'असो आता चाड'** या श्री. संदीप जगदाळे यांच्या काव्यसंग्रहातील कवितांचे वाचन, श्री. नीतिन रिंढे यांच्या **'लीळा पुस्तकांच्या'** या ग्रंथाचे तसेच डॉ. स्नेहल तावरे व डॉ. भास्कर शेळके यांनी संपादित केलेल्या **'विचारधारा'** या ग्रंथातील वेचक उतारे, याशिवाय दै. सकाळ मधील 'सप्तरंग' (दि. १३ ऑक्टों. २०१९) पुरवणीतील खोपोली महाविद्यालयातील मराठीचे प्रा. भाऊसाहेब नन्नवरे यांच्या **'समृद्ध करणारा वाचनानुभव'** इ. लेख व ग्रंथाचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन करून चर्चा घडवून आणली. प्रथम वर्ष कला या वर्गातील कु. स्मीता देशमुख, शेटे चेतना, आरती गुप्ता, गौरी भालेराव, श्री. अमोल घोईरत, ऋषिकेश काळे, तर प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातील कु. ऋतुजा ढमढेरे, भाग्यश्री बारवे, रसिका सैद, धनश्री चासकर, श्री. दिपेश निघोट, अजय मुळूक इ. विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सामूहिक वाचनात रंगत वाढवली.

**७. मराठी विभागाचे ग्रंथालय**

विभागाच्या ग्रंथ दालनात विविध विषयावरील मौल्यवान असे २७२ ग्रंथ व संदर्भ ग्रंथ आहेत. यात मराठीतील दर्जेदार अशी १२७ नियतकालिके आहेत. या सर्वाची अंदाजे किंमत **२४३०९/–** रूपये इतकी आहे. विभागातील विद्यार्थी व शिक्षक या ग्रंथालयाचा वापर आपल्या दैनंदिन अध्ययन व अध्यापनासाठी करतात.

**८. मराठी भाषा पंधरवडा**

विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात दि. ०१/०१/२०२० ते १५/०१/२०२० या कालावधीत अभ्यास सहल, विद्यार्थी कविसंमेलन, मराठी वार्तापत्र प्रकाशन इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथवाचन आणि ग्रंथ अवलोकन, ग्रंथप्रेम, ग्रंथाबद्दल आपुलकी, आस्था निर्माण व्हावी, वाचन संस्कुती रूजावी या उद्देशाने दि.८ जानेवारी २०२० रोजी फलोदे ता. आंबेगाव जि. पुणे येथे डॉ. अमोल वाघमारे व समविचारी मित्रांनी एकत्र येऊन लोकवर्गणीतून आणि शासनाचे कोणतेही अनुदान न घेता स्थापन केलेल्या शहीद राजगुरू ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालयास मराठी विभागातील विद्यार्थी व शिक्षकांनी अभ्यास सहलीच्या माध्यमातून भेट दिली. या ठिकाणी लोकदेणगीतून ग्रामस्थांना विश्वासात घेऊन ग्रंथालयाची उभारणी केलेली आहे. या ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रामस्थ, लहान मुले, स्त्री व पुरूष, विद्यार्थी यांच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी विविध प्रकारांतील पुस्तके, ग्रंथ व नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यात कथा, कादंबरी, चरित्रे, आत्मचरित्रे, वैचारिकनिबंध, चरित्रमाला, प्रबोधनात्मक पुस्तके व पुस्तिका, मौल्यवान संदर्भग्रंथ, स्पर्धापरीक्षा विषयक ग्रंथ व नियतकालिके, बालवाङमय, किशोर वाङमय, दैनंदिन वर्तमानपत्रे इ. येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या सर्वाची पाहणी व निरीक्षण या अभ्यास सहलीत सहभागी झालेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी केली आहे. या शिवाय

याठिकाणी बहिशाल शिक्षण केंद्राची व्याख्यानमाला, निवासी शिबिरे, आरोग्याच्या समस्या व त्यावरील उपाय, लोकवर्गणीतून उभारलेला दवाखाना, शालेय मुलांच्या विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन, सामूदायिक विवाह सोहळे, भीमाशंकर बेरोजगारांची सहकारी पतसंस्था, या पतसंस्थेची नाचणी लाडू, मध, लोणचे, हातसडीचे तांदूळ इ. उत्पादने, शासनाच्या विविध ग्रामविकासाच्या योजनेबद्दलची जागृती, कला, साहित्य संस्कृतीची जोपासना करण्यासाठी आयोजित केलेली साहित्यसंमेलने, परिसंवाद, लेखक विचारवंत अभ्यासकांशी आयोजित केलेले वार्तालापाचे कार्यक्रम, महिला बचत गट, साक्षरता वर्ग, विधवा, अपंग, निराधारांसाठीचे मदतकार्य, सायकल वाटप, वृक्षारोपन, समाजजागृतीपर पथनाटयाचे आयोजन इ. ग्रामविकासाचे रचनात्मक कार्य सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणेने तसेच आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भूमिकेतून येथे अनेक समाजोपयोगी उपक्रम संपन्न होत असल्याचे याप्रसंगी सावरलीचे माजी सरपंच श्री. अशोक पेकारी यांनी सांगितले. या ठिकाणच्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती या ग्रंथालयाचे कार्यकर्ते श्री. अशोक जोशी यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

**९. कविसंमेलनाचे आयोजन**

वेदनेच्या हुंकारातून कविता जन्म घेते. कविच्या अस्वस्थ व संवेदनशील मनाचा शाब्दीक आविष्कार म्हणजे कविता होय. कविता ही बंडखोरीची असते, असे मत ओतूर येथील सुप्रसिद्ध कवी **'टाहोरा' कार** श्री. अनिल साबळे यांनी दि. ११ जानेवारी २०२० रोजी केले. महाविद्यालयातील मराठी विभाग व विद्यार्थी विकास मंडळ आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने महाविद्यालयात काव्यवाचन कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या काव्यवाचन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, प्रा. भाऊसाहेब थोरात, डॉ. छाया जाधव, डॉ. प्रभाकर मोकळ, प्रा. पोपटराव माने, प्रा. घायतडके, तसेच महाविद्यालयातील कु. प्रियांका हुले, दिपाली रोकडे, सायली घुले, श्रुती घोडेकर, रसिका सैद, प्रतिक्षा कोकणे, अश्विनी जोशी, योगिता काथेर, श्री. तुषार गभाले, नितेश काळे, समीर गारे, इ. विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षकांनी आईचे महत्त्व, माया, मातृप्रेम, बाप, संस्कृती, प्रेम आणि जीवन, प्रेमभंग, निसर्ग, ग्रामीण वास्तव, महिलावरील अत्याचार, बळिराजा, शेतकरी, शेतमाल भावाचा प्रश्न, शेतकरी आत्महत्या, भ्रष्टाचार, सध्याची राजकीय व सामाजिक परिस्थिती इ. विषयावर उत्स्फुर्तपणे कविता सादर करून उपस्थित रसिक श्रोत्यांची मने जिंकून घेतली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे असलेल्या श्री. अनिल साबळे यांनी आपल्या **'टाहोरा' या कवितासंग्रहातील आश्रमशाळेतून घरी जाताना, आता ही व्यवस्थाच, प्रगतिपुस्तक इ. लक्ष्यवेधक कविता वाचून या कार्यक्रमाची खऱ्या अर्थाने रंगत वाढविली.** या कार्यक्रमात ८० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**१०.मराठी वार्तापत्र प्रकाशन :**

मराठी नाटयसृष्टीतील प्रतिभावंत नाटयअभिनेते, कलावंत, आत्मचरित्रकार, पुरोगामी विचारवंत डॉ. श्रीराम लागू यांच्या कार्य कर्तृत्त्वाचा परिचय विद्यार्थ्यांना होण्याच्या हेतूने मराठी विभागाने डॉ. श्रीराम लागू विशेषाकांचे प्रकाशन दि. ११ जानेवारी २०२० रोजी ओतूर येथील सुप्रसिद्ध कवी **'टाहोरा' कार** श्री. अनिल साबळे यांचे शुभहस्ते मराठी करण्यात आले.

**११.मराठी राजभाषा दिन**

मराठी विभागाच्या वतीने ज्ञानपीठ विजेते लेखक कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिन दि. २७/०२/२०२० रोजी 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी घोडेगाव येथील **मायबोली साहित्य सांस्कृतिक ग्रंथालयाच्या संस्थापक मा. हिराबाई काळे यांची मुलाखत विद्यार्थी व शिक्षकांनी घेतली.** या प्रसंगी विद्यार्थी व शिक्षकांनी त्यांना वाचनाची आवड व छंद, आवडते लेखक, शिक्षण, घरातील संस्कार, मायबोली ग्रंथालयाची स्थापना, त्यासाठी मिळालेले प्रोत्साहन, पूर्वीची आणि आजची शिक्षणप्रणाली आणि भाषाविषयक शिक्षण, त्यांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह, भाषेची गुलामगिरी, राजकीय व औद्योगिक स्थित्यंतरे इ. अनेक विषयावर विद्यार्थी व शिक्षकांनी प्रश्न विचारून मुलाखतीची रंगत वाढविली. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका मा. हिराबाई लक्ष्मण काळे, डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. गुलाबराव पारखे, डॉ. चांगुणा कदम, प्रा. सोमनाथ जगताप इ. मान्यवर उपस्थित होते.

**१२. अभ्यास सहल**

मराठी विभागाच्या वतीने दि.०७/०३/२०२० रोजी सातारा येथे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. मराठीतील नवकाव्याचे जनक बाळ सीताराम मर्ढेकर यांचे जन्मगाव मर्ढे येथे आहे. तेथे विभागातील विद्यार्थी व शिक्षकांनी भेट दिली. तेथे बाळ सीताराम मर्ढेकर यांचे भव्य स्मारक आहे. या अभ्यास सहलीत २३ विद्यार्थी व २ शिक्षक सहभागी झाले होते.

**१३. तज्ज्ञ साधनव्यक्तींची व्याख्याने**

| अ. क्र. | वक्ते | विषय | दिनांक | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मा.संपदा जोशी,पुणे | भाषेची जडणघडण | २६/०६/२०१९ | २२ |
| २ | श्री. मोहन काळे, मुंबई | माझी कविता | २१/०९/२०२० | १५० |
| ३ | श्री. डी. एल. शिंदे, मंचर | मी आणि माझे साहित्य | २८/०९/२०२० | ७० |
| ४ | श्री. अनिल साबळे, ओतूर | मी आणि माझी कविता | ११/०१/२०२० | ८० |
| ५ | मा. हिराबाई काळे, घोडेगाव | मुलाखत | २७/०२/२०२० | ६० |

**१४.श्री. अंतोष मेमाणे सेट उत्तीर्ण**

पदव्युत्तर मराठी विभागातील माजी विद्यार्थी श्री. अंतोष मेमाणे (गोहे बु. ता. आंबेगाव) हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑक्टोंबर २०१९ मध्ये घेतलेल्या प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या राज्य पात्रता परीक्षेत (सेट) उत्तीर्ण झालेले आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक, सल्लागार तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

**15. Zoom App द्वारे व्याख्यान**

दि. १३ मे २०२० रोजी मराठी विभागातील प्रा. डॉ. काळे पी. डी. यांनी साहित्य विचार या विषयावर **Zoom App** द्वारे तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. दि. १९ मे २०२० रोजी मराठी विभागप्रमुख डॉ. वाल्हेकर डी.ए. यांनी भाषाविज्ञान या विषय अंतर्गत अर्थविचार या विषयावर **Zoom App** द्वारे तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले.

**१६.लॉकडाउन काळातील मराठी साहित्य, मराठी भाषा, मराठी व्याकरण व साहित्य आणि समीक्षा,भाषाविज्ञान विषयक ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेतील मराठी विभागाचा सहभाग**

| अ.क्र. | सहभागी शिक्षक व विद्यार्थ्याचे नाव | विषय | आयोजक महाविद्यालय व व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. ३) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| २ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३ | प्रा.माने पी.एम. | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ४ | प्रा.डॉ. काळे पी.डी. | मराठी साहित्य | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा |
| ५ | प्रा.डॉ.काळे पी.डी. | मराठी भाषा | लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,परतूर,जि. जालना |
| ६ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. १) | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| ७ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. १) | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| ८ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. ४) | प्रा.डॉ. गायकवाड दिपक, पुणे |
| ९ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. ४) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| १० | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. ४) | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| ११ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | दलित साहित्य | प्रा.डॉ. धनराज धनगर, हरसुल |
| १२ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | दलित साहित्य | प्रा.डॉ. धनराज धनगर, हरसुल |
| १३ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | दलित साहित्य | प्रा.डॉ. धनराज धनगर, हरसुल |
| १४ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मराठी भाषा | पारनेर महाविद्यालय,पारनेर |
| १५ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मराठी भाषा | लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,परतूर,जि. जालना |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मराठी समीक्षा | तटकरे महाविद्यालय,तळा, जि. रायगड |
| १७ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मराठी साहित्य | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा |
| १८ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | (स्पे. २) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| १९ | श्री.काळोखे संदेश विजय | मराठी भाषा | पारनेर महाविद्यालय,पारनेर |
| २० | कु.भवारी अंकिता सुभाष | मराठी भाषा | पारनेर महाविद्यालय,पारनेर |
| २१ | श्री.काळोखे संदेश विजय | दलित साहित्य | प्रा.डॉ. धनराज धनगर, हरसुल |
| २२ | श्री.काळोखे संदेश विजय | मराठी साहित्य | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा |
| २३ | श्री.पाबळे काळूराम हरिभाऊ | मराठी भाषा | पारनेर महाविद्यालय,पारनेर |
| २४ | श्री.पाबळे काळूराम हरिभाऊ | मराठी भाषा | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,करमाळा |
| २५ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | मराठी व्याकरण | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| २६ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | जी.२ | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| २७ | कु.सैद प्रतिक्षा प्रभाकर | मराठी व्याकरण | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| २८ | कु.गव्हाणे तेजश्री | मराठी व्याकरण | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| २९ | कु.पोखरकर करूणा विश्वास | मराठी व्याकरण | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| ३० | कु.भवारी सविता सीताराम | मराठी व्याकरण | प्रा.डॉ.एंडाईत शिवाजी, चाकण |
| ३१ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | मराठी शुध्दलेखन | प्रा.माळी, जामनेर |
| ३२ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३३ | कु.सैद प्रतिक्षा प्रभाकर | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३४ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३५ | कु.भवारी सविता सीताराम | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३६ | कु.पोखरकर करूणा विश्वास | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३७ | कु.गव्हाणे तेजश्री | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३८ | श्री.गभाले तुषार लंकानाथ | (स्पे. ३) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ३९ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | (स्पे. ३) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ४० | कु.घुले सायली काशिनाथ | (स्पे. ३) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ४१ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | (स्पे. ४) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४२ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | (स्पे. ४) | प्रा.डॉ. एंडाईत शिवाजी,चाकण |
| ४३ | श्री.गभाले तुषार लंकानाथ | (स्पे. ४) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४४ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | (स्पे. २) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४५ | कु.भवारी सविता सीताराम | (स्पे. २) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४६ | श्री.गभाले तुषार लंकानाथ | (स्पे. ४) | प्रा.डॉ. गायकवाड दिपक, पुणे |
| ४७ | कु.घुले सायली काशिनाथ | (स्पे. ४) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४८ | श्री.कोकाटे प्रवीण | (स्पे. ४) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ४९ | श्री.गभाले तुषार लंकानाथ | (स्पे. ४) | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| ५० | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | (स्पे. ४) | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| ५१ | कु.घुले सायली काशिनाथ | (स्पे. ४) | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| ५२ | श्री.कोकाटे प्रवीण | (स्पे.२) | प्रा.डॉ. चौरे अतुल, पुणे |
| ५३ | श्री.कोकाटे प्रवीण | (स्पे. २) | प्रा.डॉ. कसबे डी.के, चाकण |
| ५४ | श्री.कोकाटे प्रवीण | (स्पे. ४) | प्रा.डॉ. जाधव प्रतिभा, लासलगाव |
| ५५ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मराठी साहित्य | श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर |
| ५६ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | भारतीय संविधान | कला व वाणिज्य महाविद्यालय,माढा जि. सोलापूर |

**१७.कोरोना, सारी जनजागृती कार्यक्रम — प्रश्नमंजुषा स्पर्धेत मराठी विभागाचा सहभाग**

| अ.क्र. | सहभागी शिक्षक व विद्यार्थ्याचे नाव | आयोजक महाविद्यालय |
|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | विठठलराव शिंदे महाविद्यालय, टेभूर्णी |
| २ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली |
| ३ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | डॉ.आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे |
| ४ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | फोडाघाट महाविद्यालय, |
| ५ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव |
| ६ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | म.फुले महाविद्यालय, अहमदपूर |
| ७ | प्रा.माने पी.एम. | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव |
| ८ | प्रा.माने पी.एम. (कोरोना जागृती पोस्टर) | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव |
| ९ | प्रा.माने पी.एम. | जामखेड महाविद्यालय,जामखेड |
| १० | प्रा.डॉ. काळे पी.डी. | Health EMERGENCIES Programme |
| ११ | प्रा.डॉ. काळे पी.डी. | राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर |
| १२ | श्री.गभाले तुषार लंकानाथ | विठठलराव शिंदे महाविद्यालय, टेभूर्णी |
| १३ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | विठठलराव शिंदे महाविद्यालय, टेभूर्णी |
| १४ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | विठठलराव शिंदे महाविद्यालय, टेभूर्णी |
| १५ | कु.घुले सायली काशिनाथ | विठठलराव शिंदे महाविद्यालय, टेभूर्णी |
| १६ | कु.सैद प्रतिक्षा प्रभाकर | शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली |
| १७ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली |
| १८ | श्री.कोकणे ऋषिकेश | शंकरराव जगताप महाविद्यालय, वाघोली |
| १९ | श्री.गारे समीर मच्छिंद्र | इंदापूर महाविद्यालय, इंदापूर |
| २० | श्री.गारे समीर मच्छिंद्र | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव |
| २१ | कु.चव्हाण स्नेहगंधा परशुराम | बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव |

**१८.ऑनलाईन वेबिनार मधील सहभाग**

| अ.क्र. | सहभागी शिक्षकाचे नाव | विषय | आयोजक महाविद्यालय | कालावधी | स्तर |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा.डॉ.वाल्हेकर डी.ए. | मानव्यविद्याशाखेतील संशोधन व संशोधन पध्दती | पिपल्स महाविद्यालय, नादेड | १७/०५/२०२० | राज्यस्तरीय |

वरील प्रमाणे विभागाचे कामकाज करत असताना संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, सहकारी प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे, प्रा. पोपटराव माने आणि सहकारी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, विद्यार्थी या सर्वांचे अत्यंत मोलाचे योगदान लाभले आहे.

मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता आंबेगाव जि. पुणे

बी.डी.काळे महाविद्यालय कोड नं. ११६ घोडेगाव

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे